जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in





६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

☎ : (०२०) २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

• संस्थापक •

स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया एम.ए.

संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया बी.कॉम.



❖ वर्ष ४८ वे ❖ अंक १० वा ❖ जून २०१७ ❖ वीर संवत २५४३ ❖ विक्रम संवत २०७३


## या अंकात


| | पान नं. |
|---|---|
| • जिनेश्वरी : अध्याय १३ - चित्त संबुध्दि | १५ |
| • रत्नसंदेश | २२ |
| • आचार्य महाश्रमणजी | २३ |
| • कव्हर तपशील | २४ |
| • सुखी जीवन की चाबियाँ | |
| ७) अश्रितों का पालन पोषण | ३१ |
| ८) उचित ग्रह | ३३ |
| • मृत्यु को महोत्सव बनाएँ - अमरता की ओर | ३६ |
| • सफलता का शॉर्टकट - आँखों में लक्ष्य बनाएँ, दिल में जज्बा जगाएँ | ३७ |
| • धर्माच्या कॉलममध्ये जैन लिहा | ४५ |
| • ऐसी हुई जब गुरुकृपा - ऊँचाई पर जा | ४९ |
| • वैद्य का धर्म | ५१ |
| • संसार भीतर है | ५३ |
| • चाणक्य की झोपडी | ५४ |
| • आदमी दिखावा है..... | ५५ |
| • यौवन को उजियारा दो | ७३ |
| • ''बाबा'' बेस्ट सपोर्टिंग अ‍ॅक्टर | ७४ |
| • ज्वलंन्त प्रश्न | ७७ |
| • जैन भवन - कोंढवा बु।।, पुणे | ७८ |
| • संसार मुक्ति का हेतु - ज्ञान | ७९ |
| • आर्थिक चिंताओ से छुटकारा पाने के १४ नियम | ८१ |
| • राग करना आत्मा का धर्म नहीं | ८२ |
| • हास्यजागृति | ८३ |
| • आशापुरा माता मंदिर, पुणे | ८५ |
| • महामस्तकाभिषेक महोत्सव, कोल्हापूर | ८६ |
| • श्री. विजयराजजी रांका, पुणे | ८७ |
| • श्री. जैन, श्री. छाजेड - पुरस्कार | ८७ |
| • भारत वुलन हाऊस, पुणे - उद्घाटन | ९१ |
| • नवकार जैन बायोडाटा ग्रुप - अहमदनगर | ९२ |

- कजरी, पौड रोड – उद्घाटन ९३
- बाळाराम मार्केट, – उद्घाटन ९३
- श्री. प्रवीणजी चोपडा – अध्यक्षपदी ९५
- वाचकांचे मनोगत ९६
- वर्धमानायतन चॅरिटी ट्रस्ट – भिवरी १००
- अ.भा. साधूमार्गी जैन संघ – पुरस्कार १०४
- श्री. कांतीलालजी जैन – लग्नाची ५० वर्षे १११
- मिनल म्हेत्रे, पुणे – पुरस्कार ११२
- श्री. जी. डी. शर्मा – लग्नाची ७५ वर्षे ११३
- बॅडींग व पॅकेजिंग मशिन – एक वरदान ११८
- एक रुपया जादा घेतल्याने दंड १२३
- सामाजिक उद्यमिता बनाम सामाजिक सहभाग १२५
- विविध धार्मिक, सामाजिक व राजकिय बातम्या


जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर • एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित, एकूण अंक १२

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० रु. |
|---|---|---|---|---|---|

या अंकाची किंमत ५० रुपये.

- www.jainjagruti.in
- www.facebook.com/jainjagrutimagazine


# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. • 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

## जैन जागृति – वर्गणीचे दर

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |
|---|---|---|---|---|---|

वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

Bank : STATE BANK OF INDIA    Branch : Market Yard, Pune 37.

Current A/c No. : 10521020146    IFS Code : SBIN0006117

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजय:९८२२०८६९९७ सुनंदा:९४२३५६२९९१, www.jainjagruti.in**

**Email : jainjagruti1969@gmail.com B Press Email : prakash.offset@rediffmail.com**

## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

❖ **भोसरी, चिंचवड, निगडी** – श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९११४०९

❖ **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी** – श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१

❖ **गुरूवार पेठ, पुणे** – श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८

❖ **धनकवडी, पुणे** – श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५

❖ **मार्केटयार्ड, पुणे** – श्री. प्रमोदकुमार शांतीलालजी छाजेड, मो. : ९८८१८७३७१०

❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे** – निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७

❖ **सदाशिव पेठ परिसर, पुणे** – सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०

❖ **वडगाव शेरी, पुणे** – सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६

❖ **वडगाव मावळ, पुणे** – श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१

❖ **खडकी, पुणे** – श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४

❖ **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव** – श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२१३००५५९

❖ **दापोडी, पुणे** – श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६

❖ **नांदेड सिटी, पुणे** – श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६

❖ **दौंड, श्रीगोंदा** – श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२

❖ **घोडनदी, जि. पुणे** – श्री. पारसमलजी बांठिया, मो. : ९२२५५४२४०६

❖ **अहमदनगर** – श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०

❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका** – श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०

❖ **सोनई** – श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७–२३१४६१, मो. ९८८१४१४२१७

❖ **औरंगाबाद** – श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१

❖ **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३

❖ **नाशिक** – श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३–२३११००८,मो.९४२३९३९९९०

❖ **नाशिक** – मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५

❖ **बीड** – श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४

❖ **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२

❖ **श्रीरामपूर** –श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७

❖ **लासलगाव** – श्री. मनसुखजी साबद्रा, मो. : ९३२६३२५३४७

❖ **बारामती**– डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२–२२३८०७ मो.:९३२५००४९५०

❖ **अंमळनेर, जि. जळगाव** – श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७

❖ **जळगाव** – श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५

❖ **धुळे** – श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६

❖ **शहादा, जि. नंदुरबार** – श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६

❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर** – श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८

❖ **मिरज, जि. सांगली** – श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८

❖ **कोल्हापूर** – सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१–२५४२२५३

❖ **सातारा व सातारा जिल्हा** – श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

**तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत**

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.** *(क्रमशः)*

## अध्याय १३ - चित्त-संबुध्दि

एका क्षणाचे एवढेसे दुर्लक्ष - फिरावी लागतात योनी ८४ लक्ष

आपल्या जीवनात पेचप्रसंग स्वतःच्याच लहानश्या चुकीमुळे निर्माण होतात. मनुष्याच्या एका क्षणाच्या लोभापायी, आसक्ती पायी जन्मों-जन्मीचे गणित चुकून जाते. प्रभुच्या मार्गावर चालताना प्रपंचाची इच्छा जन्म घेते, साधना करतांना वासना जन्म घेते, तेव्हा वासना तर पूर्ण होते परंतु साधनेमुळे प्राप्त झालेले बळ त्या वासनेला सबळ करते, दुष्टतेला बलिष्ट करते व दुष्टता सिध्द होते. जेव्हा साधनेत कपट येते तेव्हा साधनेपासून तर आपण वंचित होतोच पण स्वकीयांपासूनही आपण दूर होतो. नाती तुटत नाहीत पीडा देतात त्रस्त करतात. अशीच नाती कशी जगताही येतात, जोपासताही येतात व छोट्याश्या गफलतीमुळे दूरावतातही याची रोचक कहानी या अध्यायात आहे.

**जन्मोजन्मीची नाती, कशी होते त्यांची मोलमाती**

चित्त व संभुती ही अशी जोडी होती की ते एक जन्म नाही. दोन जन्म नाही पाच जन्मापर्यंत एकमेकांसोबत राहिले. पशुयोनीत बरोबर राहिले व देवलोकांत बरोबर राहिले. पाच जन्माचे सोबती नंतर वेगळे झाले असे का ?

आपल्या जीवनातही असे प्रसंग येतात. पाच वर्षाचे, १० वर्षाचे, २५ वर्षाचे नातेही तुटून जाते व आपल्या मनात प्रश्न राहतो असे कसे झाले ? परंतु चित्त संभुतीचे ५ जन्माचे नाते तुटुन जाते. नाते तुटते पण मन तुटत नाही. हृदयात भेद नाही पण तरीही ते एकमेकांबरोबर राहू शकले नाही. एका विशेष परिस्थितीत संभुतीने केलेल्या चूकीमुळे हे नाते दूरावले. ज्यावेळेस स्वतःला सांभाळायला हवे होते त्यावेळी तो भाळला गेला, ज्या समयी जागे रहायला हवे होते त्यावेळी तो झोपी गेला, जिथे थांबायला हवे होते तेथून पळू लागला. जेव्हा चित्तने सांभाळून घेण्याचा प्रयत्न केला की, ''नाही, संभूती तू त्या मार्गावर इतक्या दिवसात गेला नाहीस, इतक्या दीर्घ कालावधीत गेला नाहीस आता त्या मार्गाकडे का जात आहेस ? अजुनही परत फिर... कारण अजुनही फक्त तुझे मन तिकडे गेले आहे शरीर गेलेले नाही. तुझ्या मनाला माघारी आढून घे. का आपल्या मनाबरोबर चेतनेलाही जोडून घेत आहेस..?'' सुखाच्या लालसेत अडकलेले मन बधीर झाले होते त्यामुळे संभूतीने ऐकले नाही.

**पापाला निर्बीज करण्याचा मंत्र**

मन गेले आहे, मनाला माघारी ओढून घेता येते. भावना बिघडली, भावनेला पुन्हा सांभाळता येऊ शकते त्यालाच म्हणतात प्रतिक्रमण-प्रायश्चित्त. जी चुक झाली आहे ती स्विकारणे आणि पुन्हा न करण्याचा संकल्प करणे म्हणजे प्रतिक्रमण.

जेव्हा जेव्हा आपल्या मनवचन कायेद्वारे पाप कर्म होते तेव्हा भगवंतांची प्रार्थना करायची असते.

हे प्रभु, हे भगवंता माझे पाप माझ्या जीवनात बीज बनु नये. धर्म बीज बनो, कर्म बीज बनु नये .. साधना बीज बनो, विराधना, कष्ट हे बीज न बनो. पुण्य बीज बनो, पण पाप बीज न बनो, बीज तर राहणारच, मूळ तर राहणारच परंतु त्यातुन अंकुर येऊ नये, बीजाचे पुन्हा झाड बनु नये.

पापाच्या बीजाला निर्बीज करण्याची कला आहे ती म्हणजे अपराधाची स्वीकृती व भगवंताची भक्ती. पुन्हा असा अपराध करणार नाही. असा संकल्प कर. आपणही आपल्या जीवनात असा प्रयोग करू शकतो. दिवसा काही चूक झाली, रात्री त्याची आठवण झाली, तर लगेच प्रभुकडे प्रार्थना करा. 'प्रभु ही चूक माझ्याकडून परत होणार नाही.' बस एवढेच केले की प्रतिक्रमण झाले ते पाप तिथेच थांबते जे पाप आपल्याकडून झाले आहे. त्या बीजाचे रोप वा वटवृक्ष होणार नाही. परंतु ही प्रक्रिया न केल्यामुळे जन्मोजन्मीची नाती कशी मातीमोल होतात ते पाहूया.

चार गवळीपुत्र जंगलात गायीना चरायला घेऊन जातात. एक मुनी आपल्या गुरूंसह चाललेले असतात. मार्गदर्शक व एक समूहाबरोबर माधुकरी मागण्यासाठी निघालेले असतात. माधुकरी मागुन परत येतात तोपर्यंत मार्गदर्शक निघून जातो. सर्व ऋषीमुनी रस्ता चुकतात. त्या निबीड अरण्यात रस्ता शोधून शोधून दमून जातात. चालण्याचे त्राण सुध्दा रहात नाही. अशा अवस्थेत चारी गवळीपूत्र त्यांना पाहतात. त्यांना त्रस्त, हताश पाहून ते मुनींची सेवा करतात. चारी गुराखी त्या मुनींना दूध प्यायला देतात व त्यांची शुश्रूषा करतात. मुनी स्वस्थ होतात. आपल्या उपकार कर्त्यांवर कृपा करताना मुनी त्या गवळीपुत्रांना तीर्थकरांचा उपदेश ऐकवतात. जिनेश्वराचे भगवंताचे वरदान गवळीपूत्रांना जीवनाचे अमृत देऊन जाते. दूधाच्या बदल्यात अमृत मिळते. जीवनातील शाश्वत मार्गाची शिदोरी मिळाल्यावर ते चारही गवळीपुत्र भगवान महावीरांच्या चरणी समर्पित होऊन संन्यस्त होतात.

**पाच जन्माची सहयात्रा**

दीक्षा घेतल्यावर दोन मुनींच्या मनात अंगावरील घाणेरडे कपडे पाहून घृणा निर्माण होते. त्या घृणेमुळे पुढील जन्मात ते दशार्ग नगरीत भुर्यादन्न चांडाळाच्या घरी, त्यांच्या दासीच्या पूत्राच्या रूपात जन्मले. एकदा वडाच्या झाडाखाली दोघे झोपले असताना एकाला साप दंश करतो व तो मरण पावतो. हे पाहून त्या सापाला शोधा, त्याला मारा, त्याने माझ्या भावाला मारले.... या रागात दुसरा भाऊ सापाला शोधायला जातो. तेथे साप त्यालाही दंश करतो व तोही मरतो.

दोघेही मरण पावल्यानंतर कलिंजर पर्वतावर हरिणाच्या रूपात जन्मतात. त्या दोघांचे परस्परांवर खूप प्रेम असते. खाणे, पिणे, झोपणे राहणे सर्व बरोबरच एकदा एक शिकारी त्यांना बाण मारतो व दोघेही एकाच वेळेस मरण पावतात. तेथे मरण पावल्यानंतर राजहंसाच्या रूपात जन्म घेतात. दोघेही एकत्रच रहात असतात. एकदा एक कोळी त्यांना पकडतो व दोघांची मान मुरगाळून टाकतो. पुढच्या जन्मात मातंग बनून एका चांडाळाच्या घरी जन्म घेतात वित्त आणि संभुती म्हणून. एकदा त्या नगरीचा राजा त्याच्या एका मंत्र्यावर नमुचीवर,अशाच एका अपराधामुळे नाराज होतो त्याला त्या मंत्र्याला गुप्तपणे मारावयाचे असते त्यासाठी तो त्या चांडाळाला बोलावतो व मंत्र्याची वासलात लावण्यासाठी सांगतो. टीकाकारांनी चांडाळाला प्राणवधीक असा शब्द दिला आहे. प्राणवधिक - प्रच्छन्न - म्हणजे लपून छपून हत्या करणारा.

तर असा हा चांडाळ राजाकडून मोबदला घेऊन मंत्र्याला मारण्यासाठी घेऊन जातो. तो नमुची मंत्र्याला म्हणतो ''मंत्री महोदय, माझ्याकडे तुम्हाला मारण्याचा आदेश आहे. परंतु माझ्या अंतगृहात राहून जर तुम्ही माझ्या दोन्ही मुलांना चित्त व संभुतीला ज्ञान दिले. शिकवले तर मी तुम्हाला जीवनदान देईन.''

मंत्री मुलांना शिक्षण द्यायला सुरवात करतो. परंतु मुलांना शिकवता शिकवता त्याला त्या दोघांच्या आईविषयी प्रेम निर्माण होते. तो भोगासक्त होतो. हे चांडाळाला समजते व त्याला वाटते मी याला जीवन बाग दिली व यानेच माझ्या घराला आग लावली ! माझ्याच पत्नीशी गैरवर्तन सुरू केले आता याचे मरणेच योग्य आहे. तो चित्त व संभूतीशी बोलून त्यांना याविषयी

सांगतो. पण मुले शहाणी, समजूतदार असतात. ती विचार करतात याने आपल्याला ज्ञान देऊन उपकार केले आहे. आपल्या उपकार कर्त्याला मारणे योग्य नाही ते नमुचीला पळून जायला सांगतात. नमुची पळून जातो. शंभर अपराध झाल्यावरही जो एक उपकार लक्षात ठेऊन अपराधी व्यक्तिचे शंभर अपराध विसरतो तोच खरा धार्मिक असतो.

**कलाप्रेमी चित्त व संभूती तिरस्कृत**

चित्त व संभुती त्यांच्याकडून कलेचे ज्ञान घेतलेले असते. ते संगीत पारंगत होतात. एकदा त्या नगरीत मदन-महोत्सव साजरा होत असतो. दोघेही आपल्या कलापथकासह महोत्सवात पोहोचतात. दोघांच्याकडे रूपसौंदर्य होते व कलेचे सौंदर्य होते. त्यांच्या गायनाच्या स्वरलहरी कानात अमृत लहरी निर्माण करतात. जो-तो मुग्ध होऊन त्यांच्याकडेच आकर्षित होतो. पण म्हणतात ना ! स्वत: जळणारे कधी कधीच असतात पण जाळणारी आग सदैव असते, मत्सरी, निंदक सर्वत्र असतात. त्या उत्सवात ही असे काही ब्राह्मण होते ज्यांना हे पाहावले नाही ज्यावेळेस स्वत:त पुरूषार्थ नसतो कर्तृत्व नसते तेव्हा व्यक्ती अनावश्यक बाबी काढून समोरच्याला त्रस्त करण्याचा प्रयत्न करतो.

ते या दोन्ही मुलांची चौकशी करतात व माहिती काढतात. त्यांना समजते की ही चांडाळाची मुले आहेत त्यांना काटा काढायचे सूत्र मिळून जाते ते राजाकडे जातात व सांगतात ''राजे ही चांडाळाची मुले आपल्या राज्यात राज्य करताहेत.'' राजा त्या ब्राम्हणांना समजावतो की ''त्यांच्याकडे कला आहे'' तेव्हा ब्राह्मण म्हणतात ''कला असली म्हणून काय झाले ? त्यांचा भूतकाळ तर घाणेरडा आहे. हाकलून द्या त्यांना'' शेवटी राजा त्यांना हद्दपार करतो.

काही दिवसांनी कौमुदी - उत्सव येतो. चित्त व संभुतीला राहवत नाही. तोंडावर कापड बांधून ते उत्सवात सामील होतात. उत्सवाचा आस्वाद तर घ्यायचा पण गायन करायचे नाही. पण उत्सवात जसे स्वरलहरींचे गुंजन सुरू होते. दोघे ते गीत गुणगुणायला लागतात. जेव्हा अंतरंगात गीत-संगीत चालु असेल तेव्हा ते गुणगुणने थांबविणे खूप कठीण जाते. चित्त आणि संभुति गुणगुणण्यात तल्लीन झाले, आसपासचे लोक मुग्ध झाले. त्यांच्या गायनावर खूष झाले व म्हणू लागले ''अरे! का तुमचा चेहरा लपवित आहात ? तुमचा आवाज इतका सुंदर आहे तुमचे रूपही पाहु द्या.''

आणि जसे तोंडावरचे कापड दूर केले, सारे आवाक् झाले 'अरे ! हे तर तेच चित्त व संभुती आहेत.' चित्त व संभुतीला पुन्हा मारण्यात व लाथाडण्यात आले त्यांचा धिक्कार केला गेला. निराश झाले. 'काय आपल्या कलेचा उपयोग ? काय आपल्या बुध्दीचा उपयोग ? काय आपल्या सौंदर्याचा उपयोग? आम्ही फक्त चांडाळ कुळात जन्म घेतला म्हणून सर्व व्यर्थ झाले. असे जीवन जगून तरी काय फायदा ? अंतरंगात गीत आहे पण ते गाऊ शकत नाही. मनात नर्तन आहे पर नाचू शकत नाही. सौंदर्य आहे पण दाखवू शकत नाही. अशा शरीराला घेऊन काय करायचे? गेले ते दोघे आत्महत्या करायला.

**चित्त-संभुतीला मुनींचे पसायदान**

एका डोंगराच्या शिखरावर गेले. तिथुन उडी मारणारच.. इतक्यात त्यांच्या दृष्टीला एक मुनी दिसले मुनी आतापना घेऊन साधनेमधे लीन होऊन उभे होते. शरीर जीर्णशीर्ण होते. पण चेहऱ्यावर विलक्षण तेज होते. चित्त व संभुतींनी विचार केला. मरण्यापूर्वी वंदन करू या मुनीला व गेले ते वंदन करायला.

मुनींनी त्यांना समजावले ''का आत्महत्या करीत आहात? अरे एवढे सौभाग्य मिळाले आहे, मनुष्याचे शरीर, मनुष्याचे जीवन मिळाले आहे तो व्यर्थ का करीत आहात ? लोकांच्या वेडेपणाची शिक्षा स्वत:ला का देत आहात ? लोक तुमच्या कर्तृत्वाचा सन्मान, आदर करू शकत नाही ही त्यांची चूक आहे. त्यांच्या

चुकीची शिक्षा तुम्ही स्वत:ला का देता ? जिनशासनाला शरण या ! घ्या दीक्षा व अंत करा मागील जीवनाचा, शरीराला जिवंत ठेवा, पूर्वीचे सर्व संबंध सोडून जिवंत आत्महत्या करा.''

बंधुंनो, जर कधी जीवनात आत्महत्येचा प्रसंग आला तर जिवंत आत्महत्या करा. संन्यास घ्या व हे मनुष्य जन्म सार्थक करा. चित्त आणि संभुती आता चित्तमुनी व संभुती मुनी बनले. साधना करू लागले. अशी अपूर्व साधना करू लागले की साधने बरोबर ज्ञानही आले व ध्यानही आले.

**जेव्हा चंदनाला लागते आग**

इकडे नमुची जो पळाला तो थेट हस्तिनापूरला जाऊन सनत् चक्रवर्तीचा मंत्री झाला, चित्तमुनी संभुतीमुनी एकदा विहार करता करता हस्तीनापुरला आले. एकदा संभुती मुनी मासखमणच्या पारण्यासाठी माधुकरी आणायला निघाले. नमुचीच्या दारात पोहोचले. नमुचीने पाहिले ! हा आला.. तसे पाहिले तर चित्त व संभुतीचे त्याच्यावर अनेक उपकार होते म्हणतात ना ... ज्याच्या अंतरंगात पाप लपलेले असते तो आपल्या उपकार कर्त्याला सुध्दा सहन करीत नाही.

नमुचीला एकच भीती होती हा भूतकाळ, माझा इतिहास जाणतो. याने माझा इतिहास सांगितला तर माझे भूगोल धोक्यात येईल, माझी प्रतिष्ठा धोक्यात येईल. म्हणुन तो संभूती मुनीला मारू लागला. त्याचबरोबर लोकही मारू लागले. संभुती मुनीनी पाहिले, अरे हा तर नमुची... याला आम्ही मृत्युपासून वाचविले, हा आमचा गुरू असुनही का मारीत आहे? लोक का मारीत आहेत ?

त्याने खुप वेळ सहन केले पण मारणे थांबले नाही. मग चंदनाला आग लागली. थंड अशा चंदनातून आग निघू लागली. तेजोलेश्या प्रकट झाली. हस्तीनापुरात धुरच धुर पसरला. लोक बेशुध्द पडू लागले. लोक त्रस्त झाले निस्तेज झाले. सनत्चक्रवर्तीला सारा प्रकार समजला. तो मुनींकडे गेला व माफी मागितली पण तो थांबायला तयार नव्हता.

चित्त मुनीना ही बातमी समजली. चित्त मुनी तिथे आले व संभुतीला म्हणाले ''संभुती शांत हो क्रोधाला शांत कर. अपराध्यावर कृपेचा वर्षाव कर, क्रोधाचा वर्षाव करू नकोस सांभाळ.'' संभुती शांत झाला. सनत चक्रवर्ती शांत करू शकला नाही. प्रजा शांत करू नाही शकली. पण चित्तने संभुतीला सांभाळले, सांभाळणाऱ्यात योग्यता असावी लागते.

**भगवंत होता होता नरकाची यात्रा**

ते दोघे तेथून निघाले व साधना स्थळावर आले झाल्याप्रकारचे चिंतन करू लागले. पुरे आता जगणे संलेखना करू या.. दोघांनी आजीवन संलेखनाची शपथ घेतली. समाधीमध्ये बुडून गेले जेव्हा सनत् चक्रवर्तीला समजले की नमुचीमुळे हे सर्व काही झाले होते. तो नमुचीला पकडून मुनींकडे घेऊन जातो. मुनी राजाला समजवतात ''राजा, हा तर उपकारकर्ता आहे याने आम्हाला ज्ञान दिले, कला दिली हा आमचा गुरू आहे याला बंधनमुक्त करा.''

बंधुनो जे साधक असतात ते उपकारकर्त्याचे उपकार लक्षात ठेवतात नमुचीने दिलेला त्रास त्यांच्या लक्षात नाही राहिला पण त्याने दिलेल्या ज्ञानाला त्यांनी लक्षात ठेवले. लक्षात ठेवा बंधुंनो...

उपकाराचे स्मरण ठेवाल तर उपकार चालुन येतील
अपकारीचे स्मरण ठेवाल तर अपकार चालून येतील
अनुग्रहाला मनात जिवंत ठेवाल तर अनुग्रह जीवनात येतील
विग्रह मनात जिवंत ठेवाल तर विग्रह जीवनात येईल.
जीवनात ज्याला आपण आपल्या मनात जीवंत ठेवतो तो न बोलवता येतो.

चक्रवर्तीला आश्चर्य वाटले अशी उंची गाठणारेही साधक असू शकतात ? सुभद्रा राणीने मुनींच्या साधनेबद्दल ऐकले व तिला त्यांच्या दर्शनाची इच्छा झाली. आणि सनत् चक्रवर्ती संपूर्ण परिवारासह मुनींच्या

दर्शनाला गेला. मुनींच्या चारित्र्य व तेजाने भारावलेली सुभद्राराणी मुनींना वंदन करण्यासाठी वाकली व नकळतच तिच्या रेशमी केसांचा स्पर्श संभुती मुनींच्या पायाला झाला.

मंद स्पर्श नेहमी मुनींना भुरळ घालतात. पण ते मनाला जोडू नये. संभूतीचे मन मंदस्पर्शाशी जोडले गेले व त्याला वाटू लागले 'ज्याची अशी राणी असेल असा चक्रवर्ती मी बनावे. पुढील जन्मी मी काही होईन तर चक्रवर्ती.' सिध्दीच्या शिखरावर पोहचता पोहचता भोगाचा समुद्र पुढे आला व नरकाचे द्वार उघडले गेले. चित्तमुनींनी हे जाणले व संभुतीमुनींना समजाऊ लागले ''अरे संभुती, तु राखेत तुप का ढवळीत आहेस । सिध्दीची साधना का व्यर्थ करीत आहेस ? प्रायश्चित घे व या पापवृत्ती पासून मुक्त हो, सांभाळ संभुती.''

परंतु... क्रोध शांत होणे सोपे असते पण अहंकाराला दूर करणे अवघड असते, मोहापासून परावृत्त होणे अवघड असते संभुतीच्या अंतरंगातील भोगाची इच्छा चित्त दूर करू नाही शकला व पुढील जन्मीसंभुती ब्रम्हदत्त चक्रवर्ती बनला.

**ब्रह्मदत्त चक्रवर्तीला गतजन्मीचे स्मरण**

चित्त एका श्रेष्ठीच्या घरी जन्मला. एकदा संत श्लोक म्हणत होते ते श्लोक ऐकले 'एकोही धम्मो नरदेव ताणं'- धर्मंच फक्त रक्षण करू शकतो. इतर कोणीही रक्षण करू शकत नाही. तो श्लोक ऐकून तो दीक्षित झाला. एकदा ब्रम्हदत्त चक्रवर्तीच्या दरबारात मधुकरी नृत्य चालू होते नाटकाच्या माध्यमातुन सादर केलेले नृत्य व गीत राजाच्या मनात आले, हे मी पूर्वी कधीतरी पाहीले आहे, कुठेतरी पाहिले आहे....

बंधुंनो आपल्याही जीवनात बरेचदा असा प्रसंग येतो. पहिल्यांदाच पहात असलेली एखादी व्यक्ति, एखादी घटना, एखादा प्रसंग पूर्वी पाहिल्यासारखा वाटतो. अशावेळी डोळे बंद करा, मन नियंत्रित करा. व स्वत:मध्ये शोध चालू करा.

जो शोधतो त्याला सापडते. जो खोलवर जातो त्याला मोती मिळतात. जो वरवर पाहतो त्याला कचरा मिळतो कचरा घ्यायचा की मोती घ्यायचे हे आपल्या हातात असते.

ब्रह्मदत्त अंतरंगाच्या खोल पाण्यात उडी मारतो व त्याला मागील जन्माची आठवण होते. देवलोकातील पद्मिनी विमानात हेच नाटक पाहिले होते. नाटकाबरोबर त्या जन्मातील भावाचीही स्मृती होते त्याचे मन तडफडू लागते, कोठे आहे माझा भाऊ.. ? पाच जन्मामध्ये माझ्याबरोबर होता. सहाव्या जन्मात का वेगळा झालो? त्याने एक श्लोक बनवला.

पाच जन्मात बरोबर होतो, दास म्हणून एकत्र जगलो,

हरीण बनून एकत्र चरलो, हंस रूपात अवतरलो.

मातंग बनून आपण जगलो, बरोबरच देवलोकात पोहोचलो.

पाच जन्माच्या सहयात्री, सहाव्या जन्मात का दुरावला ?... संभुती, अर्थात ब्रह्मदत्त चक्रवर्तीने राज्यात घोषणा केली या काव्यपंक्तीचा उत्तरार्ध जो कोणी आणून देईल त्याला अर्धे राज्य मिळेल, चित्त मुनींनी घोषणा ऐकली व उत्तरार्थ पूर्ण केला.

हा सहावा जन्म, तु केलास नियाणा.. त्यामुळेच हा दुरावा.

श्रोत्यांनो, भगवंत एकच संदेश आपल्यापर्यंत पोहोचविण्यासाठी ही गोष्ट होती. जीवनात कधीही नियाणा करू नका नात्यात कधी नियाणा करू नका. नियाणा म्हणजे बदल्यात मागणे.

बंधूनो, बऱ्याच वेळा असे होते आई-वडील मुलांना मोठे करतात, लग्न करतात व मुलगा विसरून जातो, कृतघ्न होतो तेव्हा आई-वडील सहजच बोलून जातात 'अरे आम्ही तुझ्यासाठी किती केले व तु आमच्यासाठी काय केलेस ?' ही जी बदल्यात

मागण्याची भावना असते ना ती नियाणा होय. मित्रांबरोबर राहताना एखाद्याला तुम्ही अनेकवेळा सहकार्य केले, मदत केली व मग त्याचे सहकार्य मागण्याची वेळ आली तर तुम्ही कसे म्हणता 'मी तुझ्यासाठी इतके केले माझ्यासाठी एवढेसुध्दा करत नाही का ?' हा नियाना झाला. मागायचे तर सरळ मागा 'मला तुझ्या सहकार्याची गरज आहे. सहकार्य दे' तर सहकार्य पण मिळेल व नाते पक्के होईल. तुम्ही जर म्हणाला 'मी तुला इतक्यावेळी मदत केली आता तु मला मदत कर' तर मदत मिळेल पण नात्यात कडवटपणा येईल. मागण्याची पध्दत शिकून घ्या. एक मागणे असे असते की, जीवनभर रडावे लागते. एक मागणे असे असते की पुन्हा कधी मागावे लागत नाही.

**योगी आणि भोगीचा संवाद**

ब्रह्मदत्त चक्रवर्तीने चित्तमुनींना म्हटले, ''माझ्याकडे ये. माझ्याकडे संपत्ती आहे. सुखाची सर्व साधने आहेत का हे दीक्षेचे दु:खदायी जीवन जगतोस? माझ्याबरोबर राहून या जीवनात आनंद घे.'' तेव्हा मुनी म्हणाले ''ज्या संयम साधनेमुळे आपण शिखराला स्पर्श केला त्या संयमाच्या मार्गावर पुन्हा एकदा चल असंयमाच्या मार्गावर चालू नकोस. कोणत्या धनाची, कोणत्या धान्याची, कोणत्या सत्तेची, कोणत्या भोगाची, कोणत्या संपत्तीची तू गोष्ट करतोस ? हे नाचगाणे, हे अलंकार सारे विडंबन आहे, भारभूत आहेत. जसा सिंह प्राण्याला पकडून घेऊन जातो तसा मृत्यू जेव्हा, पकडून नेईल त्यावेळेस कोणी बहीण भाऊ, आईवडील, मुलगा कोणीही त्यात वाटेकरी होणार नाही. बाकी सर्वात वाटेकरी होता येतं पण मृत्यूचा कोणीही वाटेकरी होऊ शकत नाही. मागे राहाणारे पर्याय शोधतील व स्विकारतीलही तू फक्त स्वत:च्या कर्मासह परलोकात जाशील. राजा सांभाळ.. सांभाळ''

ब्रम्हदत्त म्हणाला ''मुनिवर, तुम्ही सांगता ते मलाही ठाऊक आहे. जाणमाणो वि जं धम्मं काम भोगेसू मुच्छिओ । – मी धर्म जाणतो तुम्ही म्हणता तेही सत्य आहे. परंतु काम भोगामध्ये इतका आसक्त झालो आहे की त्यातून बाहेर पडणे शक्य नाही.

नागो जहा पंकजलावसन्नो । दटठूं थलं नाभिसमेइ तीरं
एवं वयं कामगुणेसु गिध्दा, न भिक्खुणो मग्गमणुवव्वयामो

''चिखलात रूतलेल्या हत्तीला किनारा दिसतो. पण तो किनाऱ्यावर जाण्याचा जसजसा प्रयत्न करतो तसतसा चिखलात अधिकाधिक रूतला जातो. हत्तीची शक्ती त्याचे अवाढव्य वजन हत्तीला बाधक होत जाते. तशीच स्थिती या नियाणा मुळे होते. मी ही बेभानपणात मागील जन्मी अशुभ नियाणा केल्यामुळे, माझी ही स्थिती आहे.''

बंधूंनो, निर्वाण कल्याणकाच्या प्रसंगी एक संकल्प अवश्य करा. नियाणा कधीच नाही करणार. ज्याप्रमाणे फलहीन वृक्षाला पक्षी सोडून देतात. त्या प्रमाणे वृध्द शरीराचे भोग सोडून देतात.

जइ तंसी भोगे चइउं असत्तो, अज्जाइं कम्माइं करेही रायं !
धम्मे ठिओ सव्व पयाणुंकंपि, तो होहिसि देवो इओ विउव्वी ।

चित्तमुनींचा आपल्या सर्वांसाठी संदेश आहे. जरी तुम्ही संसार सोडू शकत नसाल, धंदा सोडू शकत नसाल, तरी हरकत नाही. आर्य कर्मांमध्ये रममाण व्हा. सर्वाबद्दल दयाभावनेने रहा धर्मामध्ये स्थित व्हा. साधू झाला नाही तरी आदर्श श्रावक व्हा, आदर्श गृहस्थ व्हा, तुम्हाला देवलोकातील सुख मिळेल.

ब्रह्मदत्त चक्रवर्ती अखेरपर्यंत स्वत:ला सांभाळू शकला नाही. गृहस्थ आश्रमात त्याने दयाव्रताचा स्विकार केला नाही. त्यामुळेच अनुपम भोग भोगून तो अनुपम नरकात, सातव्या नरकात गेला. चित्तने अनुपम साधना करून मोक्ष गती प्राप्त केली. इथे दोन गवळीपुत्रांची कथा पूर्ण होते. उर्वरीत दोन गवळी पुत्रांची कथा चौदाव्या अध्यायात सुरू होते. ●

## कव्हर तपशील - जून २०१७

- **आशापुरा माता मंदिर, पुणे**

बी.जे. भंडारी ट्रस्टच्या वतीने पुण्यात आशापुरा माता व सोनाणा खेतलाजी मंदिराची प्राणप्रतिष्ठा समारंभ ६ मे ते ८ मे या काळात झाला. गंगाधाम चौक ते शत्रुंजय मंदिर रोड या ठिकाणी हे भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरामध्ये श्री गणेश, अंबा माता, आशापुरा माता, सोनाणा खेतलाजी, महालक्ष्मी माता, सच्चाई माता, पद्मावती माता यांचीही प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

- **जयंति जैनम् साधना तीर्थ, भिवरी**

श्रमण संघाच्या महान साध्वी आगमविज्ञाता प.पू. महासतिजी डॉ. मंजुश्रीजी म.सा. व ध्यानसिद्धा प.पू. अक्षयश्रीजी (आखा) म.सा. यांच्या प्रेरणेने व परम भक्त एस. बालनजी (पुणे), प्रेमचंदजी गुप्ता (दिल्ली) व सुनिलजी लुणावत (पुणे) यांच्या पुढाकाराने वर्धमानायतन चॅरिटी ट्रस्ट ही सामाजिक संस्था व जयति जैनम् साधना तीर्थ ही धार्मिक संस्था स्थापन करण्यात आली. भिवरी येथे संस्थेच्या वतीने सुमारे २.२५ एकर जागा घेण्यात आली आहे. सदर जागेत वेगवेगळे प्रकल्प राबविण्यात येणार आहेत

७ मे रोजी भूमि शुध्दिकरण व शिलान्यासचा कार्यक्रम झाला. शिलान्यास करण्याचा लाभ श्री. कांतीलालजी राजेंद्रजी मुनोत आणि सौ. सुषमाजी सुनिलजी लुणावत यांच्या परिवाराने घेतला.

- **जैन भवन कोंढवा बुद्रुक, पुणे**

कोंढवा बुद्रुक, सुखसागर नगर पुणे येथे जैन धर्म गुरुसाठी व धार्मिक, अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी पुणे मनपाच्या निधि मधून जैन भवनची निर्मिती करण्यात यावी. असे निवेदन सकल जैन संघाने प.पू. श्री. कुंदनऋषिजी म.सा., डॉ. श्री. आलोकऋषिजी म.सा. यांच्या सान्निध्यात आमदार श्री. योगेश टिळेकर यांना दिले. गुरुच्या सान्निध्यात आमदारांना निवेदन देतांना सर्वश्री नितिन चोरडिया, नगरसेवक प्रवीण चोरबेले, कीर्ति दुगड, महेन्द्र सुंदेचा मुथा, आदेश खिंवसरा, नेमिचंद सोळंकी, भरत संचेती, नितिन चोपडा, तरुण मोदी, आनंद छाजेड, अशोक मुनोत इ.

- **श्री. विजयराजजी रांका**

सोमेश्वर फाऊंडेशन, पुणे या संस्थेने ता. १४-५-२०१७ रोजी बालगंधर्व रंगमंदिर येथे पुणे आयडॉल २०१७ या गायन स्पर्धेचे आयोजन केले होते. ओल्ड इज गोल्ड या गटात श्री. विजयराजजी रांका (गुलाबचंद चतरिंगजी ज्वेलर्स) यांनी भाग घेतलेला होता. ही स्पर्धा ४ स्तरात झाली. रांका यांनी चारही स्तरात उत्तम गाणी गाऊन या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला.

मा. आमदार श्री. विनायकरावजी निम्हण यांच्या हस्ते विजयराज रांका यांना शाल, पुष्पगुच्छ, सर्टिफिकेट, मुकुट व ट्रॉफी देण्यात आले.

- **श्री. प्रवीणजी चोपडा, पुणे**

पुणे येथे गंधर्व लॉन्स मध्ये दि. १५ एप्रिल २०१७ रोजी जैन सोशल ग्रुप इंटरनॅशनल फेडरेशन महाराष्ट्र रीजन अध्यक्षपदी श्री. प्रवीणजी चोपडा यांचा पदग्रहण सोहळा संपन्न झाला.

संपूर्ण भारतातून व महाराष्ट्रातून आलेल्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत फेडरेशनचे माजी अध्यक्ष श्री. शरदभाई शाह यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. प्रवीणजी चोपडा व त्यांच्या कार्यकारीणी, झोन को-ऑर्डिनेटर आणि कमिटी चेअरमन यांना पदग्रहणाची शपथ दिली व जैन सोशल ग्रुप इंटरनॅशनल फेडरेशनचे अध्यक्ष श्री. अभयजी सेठिया यांच्या

हस्ते श्री. प्रवीणजी चोपडा यांना अध्यक्षपदासाठी देण्यात येणारी पिन प्रदान करण्यात आली.

- **श्री. ललीत जैन व श्री. मनोजजी छाजेड – पुरस्कार**
श्री. अतुल बेहरे यांच्या 'नादब्रह्म' ढोल–ताशा व ध्वज पथकाच्या वतीने गेल्या ५ वर्षांपासून उत्कृष्ट समाजसेवा करणाऱ्या मान्यवरांना 'नादब्रह्म' पुरस्कार प्रदान करण्यात येतो. पुणे येथील धार्मिक व सामाजिक कार्यात अग्रेसर श्री. ललीतजी जैन (शिंगवी) व श्री. मनोजजी छाजेड यांना यावर्षी हा पुरस्कार देण्यात आला.

- **भारत वुलन हाऊस, पुणे**
'मान्यवर' या प्रसिद्ध ब्रँडने आता खास महिलांसाठी 'मोहे' या नावाने सेलिब्रेशन वेअर सादर केले आहे. या अंतर्गत साडी, सूट, लेहेंगा, गाऊन असे विविध प्रकार मनमोहक रंगसंगतीत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

पुण्याच्या लक्ष्मी रस्त्यावरील 'भारत वुलन हाऊस' येथे १३ मे २०१७ रोजी झालेल्या 'मोहे' या दालनाच्या उद्‌घाटन सोहळ्याला अभिनेत्री व 'मोहे' ची ब्रँड ॲम्बेसिडर आदिती राव हैदरी तसेच 'मान्यवर' ब्रँडच्या स्टोअर ऑपरेशन्स विभागाचे महाव्यवस्थापक विनोद पारीक आणि 'भारत वुलन हाऊस' चे मालक श्री. रतनकुमारजी हेमराजजी कटारिया व पवनजी कटारिया आदि उपस्थित होते.

- **''कजरी'' – पौड रोड, शोरुम**
पुण्याच्या वस्त्रविश्वातील एक लोकप्रिय नाव म्हणजे कजरी. गेल्या पाच दशकांपेक्षाही अधिक काळापासून पुणेकरांना पारंपारिक व आधुनिक पद्धतीची दर्जेदार वस्त्रांची सेवा पुरवणारे कजरी हे पुणेकरांचे अत्यंत आवडते वस्त्रदालन आहे. कजरीचे तिसरे वस्त्रदालन पुण्याच्या पौड रोडवर, गीताई संकुल मॉलजवळ सुरू करण्यात आले आहे.

- **बाळाराम मार्केट – चिंचवड स्टेशन शोरुम**
लक्ष्मी रोड, पुणे येथील गत ८० वर्षापासून कापड व्यवसायातील प्रसिध्द नाव 'बाळाराम मार्केट' यांची नवीन ब्रॅन्च महावीर चौकाजवळ, चिंचवड स्टेशन, पुणे १९ येथे सुरु झाली आहे. अक्षय तृतीया २८ एप्रिल रोजी या स्टोअर्सचे उद्‌घाटन श्री. शांतीलालजी खिंवसरा, श्री. शशिकांतजी भिकमदासजी बंब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित श्री. अभयजी बंब, श्री. गौरवजी बंब व बंब परिवार.

- **कु. मिनल म्हेत्रे, पुणे – पुरस्कार**
मोडनिंब येथे सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीर जन्कल्याणक भव्य कार्यात साजरा करण्यात आला. यावेळी जैन पत्रकाराचा सन्मान करण्यात आला. पुणे येथील दैनिक प्रभातच्या उपसंपादिका व पत्रकार कु. मिनल म्हेत्रे यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

- **श्री. जी. डी. शर्मा, पुणे – लग्नास ७५ वर्षे**
व्यापारी मित्राचे संपादक श्री. जी. डी. शर्मा व सौ. सावित्रीदेवी शर्मा यांच्या लग्नास ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल एक कार्यक्रम शर्मा परिवारातर्फे पुणे येथे संपन्न झाला. यावेळी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून शर्मा परिवाराला शुभेच्छा दिल्या.

- **श्री. कांतीलालजी जैन, मुंबई – लग्नास ५० वर्षे**
जैन कॉन्फरन्सचे पूर्व राष्ट्रीय अध्यक्ष, विश्वस्त व राष्ट्रीय प्रमुख मार्गदर्शक पी. एच. जैन, उद्योग समुहातील प्रमुख श्री. कांतीलालजी जैन व सौ. सुशिलाजी जैन यांच्या लग्नास ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल मुंबई येथे पी.एच. जैन परिवारातर्फे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी संपूर्ण भारतातून अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून जैन परिवाराला शुभेच्छा दिल्या. ●